जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

**-:प्रेस नोट :-**

दिनांक :-१७/०७/२०२६

# " मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावत जिल्हापेठ पोलिसांची दमदार कामगिरी; ११ चोरीच्या मोटारसायकलींसह ३ आरोपी जेरबंद "

===०००===

**जळगाव शहरातील वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हापेठ पोलीस स्टेशनच्या पथकाने विशेष मोहीम राबवून चोरीच्या ११ मोटारसायकली हस्तगत केल्या असून ३ आरोपींना अटक केली आहे**

जळगांव शहरतील मोटर सायकल चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेता **मा. पोलीस अधीक्षक, श्री. श्रीकांत धिवरे** यांनी शहरातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ अशा प्रकारचे दाखल गुन्हयांतील आरोपीतांचा शोध घेवुन त्यांचेकडून चोरीस गेलेल्या मोटरसायकल हस्तगत करणे बाबत मागदर्शनपर सुचना दिल्या

त्यानुषंगाने जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री. अनिल वाघ यांनी आपले पोलीस स्टेशनचे अधिपत्याखालील अधिकारी/अमंलदार यांचे **विशेष पथक** तयार करुन त्यांना गुन्हा उघडकीस आणणे बाबत सुचना दिल्या

जळगाव शहरातील सिव्हिल हॉस्पिटल परिसरातून चोरीस गेलेल्या मोटारसायकल प्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि क्र. २१९/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (BNS) प्रमाणे दाखाल गुन्हयांचा सदर पथकांकडुन तपास सुरु करण्यात आला सदर पथकांकडुन तात्काळ परिसरातील सर्व सीसीटिव्ही फुटेतची तपासणी व तांत्रिक पद्धतीने तपास करत असताना सदर पथकाने प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे **आरोपी जियाउलहक अब्दुलहक शेख वय ३४, रा. आझादनगर, अडावद, ता. चोपडा, जि. जळगाव** यास ताब्यात घेतले. सखोल कौशल्यपुर्ण चौकशी केली असता, त्यांने सदर गुन्हयांसह इतर ठिकाणी देखील मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. **आरोपीच्यां ताब्यातुन एकुण २,२०,०००/- रुपये किंमतीचे एकुण ०७ मोटर सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

हस्तगत करण्यात आल्या मोटारसायकली या जिल्हापेठ, पारोळा तसेच शिरपूर, चोपडा, यावल आणि मध्यप्रदेश राज्यातील विविध ठिकाणांहून चोरी केल्याचे निष्पन्न झाले असून संबंधित पोलीस ठाण्यांशी समन्वय साधून पुढील तपास सुरू आहे.

तसेच गुन्हा रजि १०७/२०२६ या गुन्ह्याच्या तपासात तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे **आरोपी उमेश प्रदीप पाटील वय २२, रा. पिंगळवाडी, ता. अमळनेर, ह.मु. रायपूर एमआयडीसी, जळगाव** यास ताब्यात घेतले. सखोल कौशल्यपुर्ण चौकशी केली असता, त्यांने सदर गुन्हयांसह इतर ठिकाणी देखील मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. **आरोपीच्यां ताब्यातुन एकुण १,७५,०००/- रुपये किंमतीचे एकुण ०३ मोटर सायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

हस्तगत करण्यात आल्या मोटारसायकली या एमआयडीसी व फुले मार्केट परिसरातील चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

याशिवाय, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी पेट्रोलिंग दरम्यान **आरोपी कैलास वसंतदास मथुरे वय २८, रा. जुनोने, ता. जामनेर** हा हिरो HF डिलक्स मोटारसायकलसह संशयितरित्या फिरतांना आढळून आला. त्यांच्याकडे चौकशी केली असतां त्यांने उडवा उडवीचे उत्तर दिल्याचे लक्षात येताच त्याला ताब्यात घेवुन त्यांच्याकडे सखोल कौशल्यपुर्ण चौकशी केली असता, त्यांने सदर वाहन सोयगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. ९७/२०२४ मधील चोरीचे असल्याचे निष्पन्न झाले त्यांच्याकडुन **एकुण ३५०००/- रु किमंतीची मोटार सायकल हस्तगत** करण्यात आले. आरोपी व वाहन पुढील तपासासाठी सोयगाव पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

***एकदंरीत एकुण ०३ स्वतंत्र गुन्ह्यांतील ०३ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडुन ४,३०,०००/- रुपये किंमतीच्या ११ मोटरसायकल मोटार सायकल हस्तगत करण्यात आले आहे. यामुळे मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांवर मोठा आळा बसण्यास मदत झाली आहे.***

*जळगाव शहरातील मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी जळगाव पोलीस दलाकडून सातत्याने प्रभावी उपाययोजना व कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे हे पोलिसांचे प्रमुख कर्तव्य असून, चोरीस गेलेल्या वाहनांचा शोध घेऊन आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी **विशेष पथके कार्यरत आहेत**. नागरिकांनी देखील आपल्या वाहनांची योग्य काळजी घ्यावी, वाहन पार्क करताना सुरक्षितता बाळगावी, वाहनांना लॉक व आवश्यक सुरक्षा साधने वापरावीत. कोणतीही संशयास्पद हालचाल निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे अहवान मा. **मा. पोलीस अधीक्षक, श्री. श्रीकांत***

***धिवरे*** *यांनी शहरातील नागरिकांना केले आहे. जळगाव पोलीस दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असून, गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील.*

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी अनिल वाघ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हापेठ पोलीस स्टेशनच्या पथकाने पार पाडली. या कारवाईत सफौ संजय दोरकर, पोलीस हवालदार महेश महाजन, महेंद्र पाटील, किरण वानखेडे, जितेंद्र सुरवाडे, राजेश पदमर, संतोष सोनवणे, तेजस मराठे, अमित मराठे, प्रशांत सैंदाणे, प्रवीण जाधव, अजय सपकाळे, कमलाकर बडगुजर, नरेंद्र दिवेकर, संजय लाटे, अजय आहिरे या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

***********************************************************************************************************


पोलीस स्टेशन, जळगाव
जि. जळगांव
0257 222 9733